# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२५

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### नांदेड येथे पोलीस आयुक्तालय सुरू करण्याबाबत

**(१) ६४७ (२२-०४-२०२५) श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील वाढती गुन्हेगारी कमी करण्यासाठी नांदेड येथे पोलीस आयुक्तालय सुरू करण्यासाठीचा प्रस्ताव सन २००६ मध्ये नांदेड पोलीस प्रशासनाने शासनाकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदेड, कोल्हापूर आणि अकोला या तीन ठिकाणी पोलीस आयुक्तालय सुरू करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तिन्ही ठिकाणी पोलीस आयुक्तालय सुरू करण्याचे विचाराधीन प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०४-११-२०२५) :** (१) हे खरे नाही.

(२) राज्यात नवीन पोलीस आयुक्तालय निर्माण करण्याचे निकष व धोरण निश्चित करण्याची कार्यवाही झाल्यानंतर सदर प्रस्ताव फेरसादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(३) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालय स्तरावर राज्यात नवीन पोलीस आयुक्तालय निर्माण करणेबाबतचे निकष व धोरणाचा मसूदा निश्चित करण्याची कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मराठा सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थ्यांना ८ लक्ष उत्पन्नाची अट रद्द करून शुल्कामध्ये सवलत लागू करणेबाबत

**(२) ६८९ (०९-०४-२०२५) श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठा सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग प्रवर्गातील (SEBC) विद्यार्थ्यांनाही OBC प्रमाणे शिक्षण व परीक्षा शुल्क सवलतीसाठी ८ लक्ष उत्पन्नाची अट रद्द करून नॉन क्रिमिलियर धारकांना शुल्कामध्ये सवलत लागू करणेबाबत लोकप्रतिनिधींनी राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री यांच्याकडे माहे

ऑक्टोबर, २०२४ मध्ये लेखी निवेदनाद्वारे मागणी केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०६-११-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २९/०१/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून राज्यातील शासकीय, अशासकीय अनुदानित व शासन मान्यता प्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये / तंत्रनिकेतने आणि शासकीय विद्यापीठात विनाअनुदानित तत्वावर सुरु असलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग प्रवर्गातील (SEBC) विद्यार्थ्यांसाठी असलेली शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनेकरीता उत्पन्नाचा दाखला सादर करण्याची अट रद्द करण्यात आली असून त्याऐवजी नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर शासन मान्यता देण्यात आली आहे.

तसेच सदर आदेश शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून लागू करण्यात आले असून सदर आदेश यापूर्वी प्रवेशित सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थ्यांना देखील शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून लागू करण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २८/०७/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रिक्षा आणि मीटर टॅक्सीधारकांसाठीच्या कल्याणकारी महामंडळाच्या कार्यालयास जागा उपलब्ध करून देण्याबाबत

**(३) १०१६ (२२-०४-२०२५) श्री.सुनिल शिंदे, श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.विक्रांत पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने १० महिन्यांपूर्वी रिक्षा आणि मीटर टॅक्सीधारकांकरीता कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्यासाठी ५० कोटी रुपयांचा निधी मंडळाच्या खात्यावर जमा केला असून प्रतिनियुक्तीवर चार अधिकाऱ्यांकडे अधिभार देण्यात आला आहे मात्र मंडळाला अद्याप कार्यालय उपलब्ध नसल्याने प्रत्यक्षात कामकाजाला सुरुवात झाली नसल्याचे माहे जानेवारी २०२५ मध्ये वा त्यादम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात १५ लाख पेक्षा जास्त रिक्षाचालक आणि ८० हजारापेक्षा जास्त मीटर टॅक्सी असून सदर धारकाकडून ८०० रुपये नोंदणी शुल्क घेण्यात येत असल्याने शुल्काची जमा रक्कम १२० कोटी रुपये होत असताना शासन मात्र ५० कोटी रुपये देत असल्याने रिक्षा आणि मीटर टॅक्सी धारकांकडुन नाममात्र नोंदणी शुल्क अकारण्याबाबतची मागणी मुंबई रिक्षा टॅक्सीडेंट युनियनने केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रमुख मागणी सह रिक्षा चालकांना वयाच्या ६५ वर्षानंतर पेन्शन, रिक्षा चालक मृत्यू पावलेस त्याच्या कुटुंबीयांना दहा लाखाचा विमा किंवा नुकसान भरपाई, मुलांच्या शिक्षणासाठी दहा लाख रुपये पर्यंत बिनव्याजी कर्ज द्यावे व त्यांना पाच लाख रुपयापर्यंत विमा योजना व अन्य कल्याणकारी योजना शासनाने राबविण्याबाबत मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर महामंडळाकरीता कार्यालय व आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देऊन मंडळाचे कामकाज सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक (१७-११-२०२५) :** (१) ऑटो- रिक्षा आणि मिटर्ड टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्यास दिनांक १६/०३/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. तसेच सदर शासन निर्णयान्वये महाराष्ट्र ऑटो-रिक्षा आणि मिटर्ड टॅक्सी कल्याणकारी मंडळास शासनाकडून एकवेळचे अनुदान रुपये ५०.०० कोटी इतके मंजूर केले आहे.
(२) धर्मवीर आनंद दिघे साहेब ऑटो-रिक्षा आणि मिटर्ड टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळाकरीता सदस्य नोंदणी करताना नाममात्र शुल्क घेऊन रिक्षा आणि मिटर्ड टॅक्सी धारकांची नोंदणी करण्याची मागणी मुंबई रिक्षा युनियनने केली आहे. दिनांक २४/०७/२०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार सभासदांकडून नोंदणी शुल्क व ओळखपत्र शुल्क रक्कम रूपये ५००/- तसेच वार्षिक सभासद शुल्क रुपये ३००/- निश्चित करण्यात आले असून ऑटो रिक्षा आणि मिटर्ड टॅक्सी चालकांसाठीच्या विविध योजनांचा तपशील सदर शासन निर्णयामध्ये नमूद करण्यात आला आहे.
(३) धर्मवीर आनंद दिघे साहेब ऑटो-रिक्षा आणि मिटर्ड टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळाची कार्यपध्दती/ कामकाजाबाबतची नियमावली दिनांक २४/०७/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये जारी करण्यात आली आहे.
(४) धर्मवीर आनंद दिघे साहेब ऑटो-रिक्षा आणि मिटर्ड टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळाचे कार्यालय ठाणे येथे स्थापन करण्याबाबत दिनांक ०३/०७/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे. सद्य:स्थितीमध्ये प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे, पहिला मजला, पूर्व द्रुतगती मार्ग, लुईसवाडी ठाणे (पश्चिम) ४०० ६०४ येथे धर्मवीर आनंद दिघे साहेब महाराष्ट्र ऑटो रिक्षा आणि मिटर्ड टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळाचे मुख्य कार्यालय स्थापन करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गोंदिया जिल्ह्यातील पोलीस कर्मचाऱ्यांची संख्या वाढविण्याबाबत

**(४) १२७७ (२४-०४-२०२५) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोंदिया हा नक्षलग्रस्त जिल्हा असून तेथील लोकसंख्या १३ लक्ष २२ हजार इतकी असून तेथील लोकांच्या सुरक्षेची जबाबदारी २ हजार पोलीसांवर असल्यामुळे पोलीसांच्या कमी मनुष्यबळाअभावी सद्य:स्थितीत तेथिल कायदा व सुव्यवस्था बिघडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,उपरोक्त प्रकरणी सरासरी ५८० लोकांमागे १ पोलीस कर्मचारी मनुष्यबळ असून बंदोबस्त, विविध गुन्ह्यांचा तपास यामुळे पोलीस कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त ताण येत असल्यामुळे कर्मचारी संख्या वाढविणे गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गोंदिया जिल्ह्याची लोकसंख्या पाहता जिल्ह्यातील पोलीस कर्मचाऱ्यांची संख्या वाढवून त्यांच्यावर येणाऱ्या अतिरिक्त कामाचा ताण कमी करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा

करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०४-११-२०२५) :** (१), (२) व (३) गोंदिया जिल्ह्यात सद्य:स्थितीत १३१ पोलीस अधिकारी व २३१५ पोलीस अंमलदार असे एकूण २४४६ पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार कार्यरत आहेत. तसेच सध्या कार्यरत असलेल्या पोलीस मनुष्यबळाकडून कायदा व सुव्यवस्था चांगल्या पध्दतीने हाताळली जात असून, गोंदिया जिल्ह्यात कोणत्याही प्रकारचा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झालेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात कृत्रिम बुद्धीमत्ता विद्यापीठ स्थापन करण्याबाबत

**(५) १४१९ (२४-०४-२०२५) श्री.विक्रांत पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात एआय अर्थात आर्टीफिशिल इंटेलिजन्स युनिव्हर्सिटी (कृत्रिम बुद्धीमत्ता विद्यापीठ) स्थापन करण्यात येणार असून यासाठी समिती गठीत करावी अशी सूचना मा उच्च व तंत्र शिक्षण मंत्री महोदयांनी माहे जानेवारी,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अत्याधुनिक संशोधन, उद्योग आणि तंत्रज्ञान यांच्या सहाय्याने विद्यार्थ्यांना आणि तरुणांना आवश्यक आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचे तसेच जागतिक स्पर्धेत टिकवून ठेवणारे ज्ञान उपलब्ध करून देणारे विद्यापीठ असावे असे सुचविलेआहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबई विद्यापीठाच्या उपकेंद्रामध्ये समिती गठीत करुन कृत्रिम बुद्धीमत्ता विद्यापीठ सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (२८-११-२०२५) :** (१), (२) कृत्रिम बुध्दिमता विद्यापीठ स्थापन करण्याकरीता अपर मुख्य सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) प्रधान सचिव (माहिती व तंत्रज्ञान), संचालक (तंत्र शिक्षण संचालनालय), संचालक (माहिती व तंत्रज्ञान संचालनालय), संचालक (महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ) तसेच या क्षेत्रातील तज्ञ संस्था यांची एक समिती गठीत करावी व या समितीने याबाबतचा आराखडा तयार करुन तो शासनाच्या अवलोकनार्थ सादर करावा, असे निर्देश देण्यात आले होते.

"मात्र, सामान्य प्रशासन विभागाच्या (माहिती तंत्रज्ञान) दिनांक १७/०१/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये कृत्रिम बुध्दिमत्तेच्या (AI) विकास व स्विकारास गती देण्यासाठी, सुलभ करण्यासाठी, पाठिंबा व प्रोत्साहन देण्यासाठी धोरण व क्रियान्वयन योजना तयार करण्याकरीता १६ सदस्यीय टास्क फोर्सची स्थापना केलेली आहे. सदर टास्क फोर्सच्या शिफारशी शासनास प्राप्त झाल्यावर सामान्य प्रशासन विभागाकडून (माहिती तंत्रज्ञान) कृत्रिम बुध्दिमत्तेबाबत धोरण निर्गमित करण्यात येणार आहे.
(३) मुंबई विद्यापीठाच्या उपकेंद्रामध्ये समिती गठीत करण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील नागरिकांचे खोट्या योजना व गुंतवणुकींमध्ये कोट्यवधी रुपयांचे नुकसान होत असल्याबाबत

**(६) १४५३ (२३-०४-२०२५) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नागरिकांचे खोट्या योजनेमध्ये व गुंतवणुकींमध्ये करोडो रुपयांचे नुकसान होत असून लोकांना फसविण्याऱ्या योजनांना आवर घालण्यासाठी गुन्हे शाखेच्या अखत्यारित येणारा आर्थिक गोपनिय कक्ष सन २०२० मध्ये बंद करण्यात आला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू आर्थिक गोपनिय कक्ष पुन्हा सुरू करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय तसेच सदर कक्ष सुरू करून नागरिकांची फसवणूक थांबविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०६-११-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे,

पोलीस सह आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई यांच्या दिनांक ०७/१२/२०२० च्या परिपत्रकान्वये, कार्यरत असलेल्या कक्ष-९ (गोपनीय कक्ष) कडे तपासाकरीता असलेले सर्व गुन्हे हे जनरल चिटींग स्वरुपाचे असल्याने सदर कक्षाच्या कामात सुसूत्रता रहावी आणि प्रलंबित गुन्ह्यांचा निपटारा विहीत वेळेत करता यावा या उद्देशाने सदर कक्षातील सर्व गुन्हे, प्राथमिक चौकशा आणि सर्व मनुष्यबळ (पोलीस अधिकारी आणि अंमलदार) हे जनरल चिटींग विभागांतर्गत नव्याने निर्माण करण्यात आलेल्या कक्ष-६ (जनरल चिटींग-४) या कक्षात वर्ग करण्यात आले आहे. यापुढे कक्ष-९ (गोपनीय कक्ष) यास गोपनीय आणि तांत्रिक विश्लेषण कक्ष या नावाने संबोधण्यात येत आहे.

(२) लोकांना फसविण्याऱ्या योजनांना आवर घालण्यासाठी दिनांक १६/०४/२०२५ रोजीच्या स्थायी आदेशाद्वारे Economic Intelligence Unit स्थापन करण्यात आले आहे. तसेच, दिनांक ०५/०५/२०२५ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये E.I.U. मध्ये अधिकारी आणि अंमलदार यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मिरा भाईंदर (जि.ठाणे) एसटी स्थानकांतून बंद बस सेवा पुर्ववत सुरु करण्याबाबत

**(७) १४५७ (२४-०४-२०२५) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भाईंदर (जि.ठाणे) एसटी स्थानकातून दापोली, चोपडा, कवठेमहांकाळ, चिपळूण, श्रीवर्धन, पुणे स्वारगेट, चंदगड, तुळजापुर याठिकाणी बससेवा ये-जा करत असून सदर बससेवा गत तीन वर्षापासून बंद केल्याने त्या पुर्ववत सुरू करणेबाबत शहरातील नागरिकांनी एसटी महामंडळ मुंबई विभागीय नियंत्रक कक्षाकडे वेळावेळी मागणी करूनही अद्यापपर्यंत बससेवा पुर्ववत सुरू झाल्या नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापपर्यंत केवळ तीन भागातील एसटी सेवा सुरू असून उर्वरित बंद असलेल्या बस सेवा पुर्ववत सुरू करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक (११-११-२०२५) :** (१), (२) व (३) सद्य:स्थितीत रा.प. भाईंदर बसस्थानक येथुन भाईंदर-श्रीर्वधन, भाईंदर-कवठेमहंकाळ, भाईंदर-अनारी, भाईंदर-राजापुर नाटे, भाईंदर-कोल्हापुर, भाईंदर-जळगांव, भाईंदर-दापोली बससेवा सुरू आहेत.

---

## ठाणे परिवहन विभागात अनुकंपा तत्वावरील पदे भरण्याबाबत

**(८) १५२४ (२५-०४-२०२५) श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे परिवहन विभागात गत १५ वर्षांपासून अनुकंपा तत्वावर रिक्त असलेल्या पदापैकी ९१ पदे भरण्यात येणार असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अनुकंपा तत्वावरील रिक्त पदे कधीपर्यंत भरण्यात येणार आहेत तसेच उक्त पदे लवकरात लवकर भरण्याबाबत शासनातर्फे कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे कारणे आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक (१७-११-२०२५) :** (१) व (२) मोटार वाहन विभागातील अनुकंपा तत्त्वावरील पदे भरण्याचे कामकाज परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई यांचे कडून हाताळले जाते. सद्य:स्थितीत ठाणे परिवहन विभागाकडून अनुकंपा नियुक्तीबाबत प्रस्ताव प्रलंबित नाही.

तसेच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ठाणे विभागामध्ये मागील १५ वर्षात १११ उमदेवारांना अनुकंपा तत्त्वावर नेमणूका देण्यात आल्या आहेत. तसेच, चालक - ०२ व सुरक्षा रक्षक - १ अशा एकूण ०३ उमेदवारांना नेमणूकपुर्व वैद्यकीय तपासणीकरीता पाठविण्यात आलेले आहे. वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त होताच त्यांना नेमणूक देण्यात येईल. सद्य:स्थितीत अनुकंपा तत्वावर लिपिक - टंकलेखक - ०३, शिपाई - ०२, वाहक - ०१ असे एकूण फक्त ०६ उमेदवार रिक्त जागांअभावी प्रतीक्षा यादीत आहेत.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन ठाणे विभागात लिपिक - टंकलेखक, वाहक व शिपाई पदावर जात प्रवर्ग निहाय जागा रिक्त झाल्यानंतर सदर प्रतीक्षा यादीवरील उमेदवारांना नियुक्ती देण्यात येते.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जळगाव येथील प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयातील कर्मचाऱ्याच्या बदलीसाठी लाच मागितल्याबाबत

**(९) १५४९ (२४-०४-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयातील कर्मचाऱ्याच्या बदलीसाठी प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी तीन लाख रुपयांचा गैरव्यवहार केल्याची घटना दि ०५ डिसेंबर २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने गैरव्यवहार करण्याऱ्या संबंधित दोषीविरुध्द कारवाई करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक (१२-११-२०२५) :** (१) हे खरे नाही. तथापि, श्री.चंद्रविलास जमधाडे, मोटार वाहन निरीक्षक यांची नियुक्ती सिमा तपासणी नाका, नवापूर येथे केल्याच्या मोबदल्यात तीन लाख रुपये श्री.दिपक पाटील यांच्या वतीने श्री.भिकन मुकुंद भावे या खाजगी इसमाने मागितल्या प्रकरणी दिनांक ०५/१२/२०२४ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून श्री.दिपक पाटील प्रादेशिक परिवहन अधिकारी, जळगाव व खाजगी व्यक्ती श्री.भिकन मुकुंद भावे यांचेविरुध्द एमआयडीसी पोलीस ठाणे, जळगाव येथे एफआयआर क्र.८६९/२०२४, भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ चे ७(अ) व १२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.
(२) सदर प्रकरणी श्री.दिपक पाटील, प्रादेशिक परिवहन अधिकारी, जळगाव यांना दिनांक २७/०२/२०२५ रोजीच्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले असून त्यांचेविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ चे नियम ८ अन्वये विभागीय चौकशी करण्यास शासनाने मान्यता दिली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील एस.टी. महामंडळाचे आगार बी.ओ.टी. तत्वावर देण्याबाबत

**(१०) १७४३ (२३-०४-२०२५) श्री.राजहंस सिंह, श्री.श्रीकांत भारतीय, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य मार्ग परिवहन विभागाने प्रवासी भाड्याव्यतिरिक्त महसूल व उत्पन्न मिळविण्याच्या अनुषंगाने राज्यभरातील स्वत:च्या मालकीच्या जवळपास १५०० हेक्टर जमिनी बांधा, वापरा आणि हस्तांतरीत करा या तत्वावर खाजगी विकासकांकडे पुनर्विकासाकरीता ९९ वर्षाच्या भाडेकरारावर देण्याचा प्रस्ताव एसटी महामंडळाने शासनाकडे दिला असल्याचे माहे जाने, २०२५ च्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय
(२) असल्यास, एसटी महामंडळाचे राज्यभर २५१ डेपो आणि ५९८ बसस्थानके असून राज्यात ८४२ ठिकाणी१ हजार ३६० हेक्टर जमीन विकासकांकडे ९९ वर्षाकरीता जाणार आहे. उक्त तत्वावर विकसित करण्याकरीता सन २०१७ मध्ये राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेला प्रतिसाद न मिळाल्याने या प्रकरणी नियुक्त करण्यात आलेल्या उच्चाधिकार समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी करून पहिल्या टप्प्यातील १९ जागांकरीता निविदा प्रक्रिया सुरुवात झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्य परिवहन महामार्ग विभागाच्या मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पुणे येथील मोक्याच्या ठिकाणच्या जागांची निविदा प्रक्रिया किती व कोणत्या टप्प्यात आणि केव्हा सुरू करण्यात येणार आहे तसेच राज्यातील कोणकोणत्या जागांचा विकास करण्यात येणार आहे, तसेच सदरहू जमिनी किती कालावधीकरीता भाडेतत्वावर देण्यात येणार आहे व सदरहू जागा कोणत्या आस्थापनांना कोणत्या वापरासाठी देण्यात यावे याकरीता धोरण निश्चित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, काही जागा केंद्र व राज्य शासनाच्या कार्यालयांकरीता आवश्यकता असल्यास उपलब्ध करून देण्यात येणार असून याद्वारे शासनाला मिळणाऱ्या महसूल व उत्पन्नाच्या माध्यमातून प्रवाशांना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत तसेच या कराराअंतर्गत विकसित करण्यात येणाऱ्या महामंडळाच्या भूखंडावर स्थानिक युवकांना रोजगार व नोकरी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक (१२-११-२०२५) :** (१) शासन निर्णय दिनांक ०१/०९/२०२५ अन्वये रा.प. महामंडळाच्या अतिरीक्त जमिनींचा व्यापारी तत्वावर उपयोग करणेसाठी भाडेपट्टा कालावधी हा ४९+४९ असा एकूण ९८ वर्ष करणेत आला आहे.
(२), (३) पी.पी.पी. अंतर्गत प्रकल्प राबविणेकरीता पटलावरील प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांकडून, स्थानिक लोकप्रतिनिधिंकडून आलेल्या मागणीनुसार तथा विभाग नियंत्रक यांच्या प्राप्त प्रस्तावांनुसार ५५ प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून सदरचे प्रकल्प राबविण्यासाठी कार्यपध्दती/ धोरण निश्चित करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) व (५)केंद्र व राज्य शासनाकडून कार्यालयाकरीता जागेची मागणी झाल्यास त्याबाबत निर्णय घेण्यात येईल. सार्वजनिक -खाजगी -सहभाग अंतर्गत (PPP) विकसित करण्यात येत असलेल्या रा. प. महामंडळाच्या भूखंडावर विकासकामार्फत व्यावसायीक आस्थापना बांधण्याचे नियोजन आहे. अशा विकसनातून नोकरी / व्यवसाय / रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

---

## राज्यातील ग्रामीण भागात एसटी बसेसच्या संख्येत वाढ करण्याबाबत

**(११) १९६१ (२४-०४-२०२५) श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) करीता महिलांसाठी प्रवास भाड्यामध्ये ५० टक्के सवलत देण्याबाबतची योजना सुरु केल्याने महिला प्रवाशांच्या संख्येमध्ये वाढ झाली असून एसटी महामंडळाला आर्थिक फायदा झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महिला प्रवाशांच्या संख्येत वाढ झाली परंतु बसगाड्यांची संख्या कमी असल्याने प्रवाशांना त्रास सहन करावा लागत असून ग्रामीण भागातील बसगाड्यांची संख्येमध्ये वाढ करावी अशी मागणी महिला प्रवाशांकडून होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी वाशिम जिल्ह्यात तसेच राज्यातील ग्रामीण भागात एसटी बसगाड्यांच्या संख्येत वाढ करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक (१२-११-२०२५) :** (१) व (२) होय.
(३) व (४) रा. प. महामंडळाच्या ताफ्यात स्वमालकीच्या २६४० नवीन साध्या बसेस घेण्यात येत असून,

आजअखेर एकूण २३९९ बसेस प्राप्त झाल्या आहेत. वाशिम जिल्ह्यास ३० नविन बसेस वाटप करण्यात आल्या आहेत.

---

## वाशिम व अकोला जिल्ह्यात विद्यार्थी-विद्यार्थिनीसाठी स्वतंत्र बस सेवा सुरु करण्याबाबत

**(१२) २०२२ (२४-०४-२०२५) श्री.धीरज लिंगाडे, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम व अकोला जिल्ह्यात विविध सवलतीमुळे बसमध्ये गर्दीचे प्रमाण वाढले असून ग्रामीण भागातील बसमध्ये विद्यार्थ्यांना जागा मिळत नसल्याने त्यांना शाळा-महाविद्यालयात पोहोचण्यास अडचण येत असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रवासी बसमध्ये गर्दी होत असल्याने मानव विकास मिशन एसटी बसच्या धर्तीवर विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र बस सेवा देण्याबाबत मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीनुसार वाशिम व अकोला जिल्हा येथे मानव विकास मिशन एसटी बसच्या आधारे विद्यार्थी-विद्यार्थिनीसाठी स्वतंत्र बस सेवा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक (१०-११-२०२५) :** (१) याबाबतची तक्रार / सूचना प्राप्त नाही.

(२), (३) व (४) मानव विकास योजनेंतर्गत अकोला विभागास एकूण ३५ बसेस उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. त्यापैकी मानव विकास योजनेंतर्गत अकोला जिल्हयास ०७ व वाशिम जिल्ह्यास २८ बसेसद्वारे विद्यार्थीनीं प्रवास करतात.

लोकप्रतिनिधीकडून प्राप्त मागणीच्या अनुषंगाने, तसेच विद्यार्थीनींची होणारी गैरसोय टाळण्याकरीता रा.प.महामंडळाद्वारे ११८ अतिरिक्त बसेस मानव विकास योजनेंतर्गत उपलब्ध करुन देणेबाबत नियोजन विभाग व मानव विकास आयुक्तालयास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

---

## राज्यातील दस्तऐवज परिक्षण शाखेबाबत

**(१३) २१९१ (२४-०४-२०२५) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दस्तऐवज परीक्षण शाखा (Question Documents Examiners ० r Handwriting Experts) राज्य गुन्हे अन्वेषण विभागाच्या (CID) अधिपत्यात संबंधित राज्यातील न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोग शाळा कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फौजदारी न्याय प्रक्रिया उत्तम व अधिक गतिशील करण्यासाठी राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने सुचविलेल्या शिफारशी नुसार महाराष्ट्रातील दस्तऐवज परीक्षण शाखा राज्य गुन्हे अन्वेषण विभागातून (CID) मुक्त करून ‘न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेच्या अधिपत्याखाली आणणे गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाढत्या फौजदारी गुन्ह्यांच्या तुलनेत हस्ताक्षर तज्ज्ञांच्या संख्येत वाढ करणे गरजेचे असून राज्यातील दस्तऐवज परीक्षण शाखेकडून 'न्यायसहायक वैज्ञानिक' प्रयोगशाळेत विलीन करण्याची मागणी सातत्याने होत असून 'समर्थन' या संस्थेने विभागाला निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी गृह विभागाने यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०३-११-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यातील दस्तऐवज परीक्षण शाखा (Question Documents Examiners Or Handwriting Experts) राज्य गुन्हे अन्वेषण विभागाच्या (CID) अधिपत्याखाली आहे.
(२) यासंदर्भात गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या दस्तऐवज परीक्षण शाखेचे न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयामध्ये विलिनीकरण करणेबाबत प्रस्ताव विचाराधीन नाही.
(३) होय, हे खरे आहे.
(४) शासन पत्र दिनांक ०३/०७/२०२५ अन्वये समर्थन संस्थेचे निवेदन तपासून कार्यवाही करण्याबाबत पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयास कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उदभवत नाही.

---

## राज्य मार्ग परिवहन विभागामार्फत २५१ बस आगारात बसेस उपलब्ध करण्याच्या महत्वपूर्ण निर्णयाबाबत

**(१४) २३४१ (१७-०७-२०२५) श्री.विक्रांत पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र परिवहन मंडळाच्या ताफ्यात पुरेशा बसेस उपलब्ध नसल्याने, तसेच असलेल्या बसेस यांची झालेली दयनीय अवस्था ही राज्यातील अनेक लोकप्रतिनिधीनी शासनाच्या लक्षात आणून दिली असता मा.परिवहन मंत्री महोदयांनी २५१ बस आगरांच्याकरीता नवीन २ हजार ६४० बसेस उपलब्ध करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला असल्याची बाब माहे मे, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य परिवहन एसटी महामंडळाच्या बस स्थानक /आगाराचे सुरक्षा लेखापरिक्षण करावे आणि येथील नादुरुस्त जप्त केलेल्या, भंगार बसगाड्या १५ एप्रिल, २०२५ पर्यंत निष्कसित कराव्यात असे शासनाने आदेश जारी केले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यशासनाने प्रवाशांच्या सोयीसांठी दरवर्षी नवीन ५ हजार बस अशा येत्या पाच वर्षात २५ हजार नवीन बस खरेदी करण्याला तत्वतः मान्यता दिली असून या वर्षी खरेदी करण्यात आलेल्या बसेसचे विभागानुसार व आगारानिहाय वितरण करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, २५१ आगारांच्या पैकी ११३ आगारात लालपरी बस पोहचल्या व उर्वरीत भंगार बस गाड्यांची स्थिती जैसे थे असल्याचेही निदर्शनास आले असून सोलापुर विभागात सुरू असलेल्या ६५०

बसपैकी बहुतांश बस जुन्या झाल्याने सोलापुर विभागाने जिल्ह्यातील विविध आगारांसाठी नवीन शंभर बसची मागणी केली असून दिनांक ३० एप्रिल २०२५ अखेर सोलापुर जिल्ह्यास केवळ ५५ नवीन बसेस मिळाल्या आहेत, हे ही खरे आहे काय आहे,
(५) असल्यास, भंगार बसगाड्या हटविण्याबाबत तसेच पनवेल बस आगार व सोलापुर जिल्ह्यातील व राज्यातील इतर आगारांच्या मागणीनुसार बस उपलब्ध करुन देण्यासंदर्भात शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक (१०-११-२०२५) :** (१) होय,
(२) महिला सुरक्षेच्या अनुषंगाने रा.प. महामंडळातील सर्व बसस्थानकाचे वरिष्ठ सुरक्षा व दक्षता अधिकारी / सुरक्षा व दक्षता अधिकारी यांचेमार्फत सुरक्षा अंकेक्षण (ऑडीट) करुन घेण्यात आलेले होते. तसेच रा.प.महामंडळाच्या वाहन ताफ्यातील जुन्या बसेस निष्कासित होत असल्याने नवीन २ हजार ६४० बसेस खरेदी करण्यात येत आहेत.
(३) संचालक महामंडळ ठरावा नुसार सन २०२५ ते २०२९ या वर्षात २५ हजार वाहने खरेदी करण्यास संचालक मंडळाने मान्यता दिली असून आजमितीस ३१ विभागातील २५१ आगारांना १९६४ नविन बसेसचे वाटप करण्यात आलेले आहे.
(४) सर्व २५१ आगारांना नवीन लालपरी बसेसचा वाटप केला आहे. सोलापूर विभागास एकूण ९० बसेस पुरविण्यात आलेल्या आहेत.
(५) व (६) जप्त केलेल्या भंगार बसगाड्या हटविण्याबाबत प्रादेशिक परिवहन कार्यालयाने परिपत्रक प्रसारीत केले आहे. पनवेल आगारास १० नवीन बसेस व सोलापूर विभागात ९० नवीन बसेस देण्यात आलेल्या आहेत. उर्वरित उपलब्ध होणाऱ्या बसेसचे वाटप आवश्यकतेनुसार विभागांना करण्यात येईल.

---

## ठाणे शहरातील वागळे इस्टेटमधील लघुउद्योजक, कारखानदार यांना खंडणीसाठी गुंडांकडून धमक्या येत असल्याबाबत

**(१५) २५५९ (१८-०७-२०२५) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे शहरातील वागळे इस्ट्रेट मधील लघुउद्योजक, कारखानदारांना खंडणीसाठी गुंडांकडून धमक्या येत असल्याच्या अनेक तक्रारी असल्याची बाब माहे एप्रिल-२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या भागातील लघुउद्योजक, कारखानदार यांच्यामध्ये भीतीचे वातावरण असून तक्रारी करुनही पोलीस प्रशासनाकडून कार्यवाही होत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०४-११-२०२५) :** (१) व (२) हे खरे नाही.

ठाणे शहरातील वागळे इस्ट्रेट मधील लघुउद्योजक व कारखानदारांना खंडणीसाठी गुंडांकडून धमक्या येत असल्याबाबत वागळे इस्टेट पोलीस स्टेशन मध्ये कोणतीही तक्रार प्राप्त नाही. तसेच मागील २ वर्षात अशाप्रकारे खंडणी मागीतल्याबाबत कोणतेही गुन्हे दाखल नाहीत.
(३) वागळे इस्टेट पोलीस स्टेशनमध्ये सदर बाबत कोणतीही तक्रार प्राप्त नाही. तथापि, लघुउद्योजक व कारखानदार संघटनांच्या पोलीसांमर्फत वेळोवळी बैठका घेवून जनजागृती करण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

## राज्यातील एसटी कर्मचाऱ्यांना अर्धा पगार देण्यात आल्याबाबत

**(१६) २५६० (१८-०७-२०२५) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील एसटी कर्मचाऱ्यांना माहे मार्च-२०२५ मध्ये अर्धा पगार देण्यात आला आल्यामुळे एसटी कर्मचाऱ्यांनी संतप्त होवून निदर्शने केले असल्याचे माहे एप्रिल-२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने सदरील कर्मचाऱ्यांचा पगार तातडीने देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक (१७-११-२०२५) :** (१), (२) व (३) रा. प. कर्मचाऱ्यांच्या माहे मार्च देय एप्रिल २०२५ च्या वेतनासाठी शासनाने उपलब्ध करून दिलेल्या निधी द्वारे रा. प. कर्मचाऱ्यांना अर्धा पगार देण्यात आला परंतु शासनाने पुन:श्च निधी उपलब्ध करून दिल्यानंतर रा. प. कर्मचाऱ्यांचे उर्वरीत वेतन अदा करण्यात आले. एकूण रुपये ४२५.२८ कोटी इतकी सवलतमुल्याची रक्कम उपलब्ध करून दिल्यावर रा. प. कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करण्यात आले आहे.

---

## राज्य शासनाने ई-बाईक टॅक्सीला मंजूरी देण्याच्या घेतलेल्या निर्णयाला रिक्षा संघटनांनी तीव्र विरोध केल्याबाबत

**(१७) २७९९ (१७-०७-२०२५) ॲड.अनिल परब, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यामध्ये प्रदूषण कमी करण्याचा रोजगार उपलब्ध करण्याचे कारणास्तव महाराष्ट्रात ई-बाईक टॅक्सीला परवानगी दिल्याने रिक्षाचालकांचा व्यवसाय आर्थिक संकटात येणार असल्याने ई-बाईक टॅक्सीला परवानगी देणे म्हणजे रिक्षा चालकावर अन्याय होणार असल्याने हा निर्णय मागे घेण्याची मागणी पुण्यातील रिक्षा चालक संघटनांनी केली असल्याची बाब माहे एप्रिल २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एक लाख लोकसंख्या असलेल्या राज्यातील शहरांमध्ये ई-बाईक टॅक्सीच्या निर्णयाला मंत्रीमंडळाच्या बैठकीमध्ये मंजूरी देण्यात आली असून या निर्णयामुळे कोल्हापूर शहरातील सुमारे १६ हजार रिक्षाचालकांना फटका बसणार असून रिक्षा व्यवसाय बंद होईल या भितीने कोल्हापूर शहरातील सर्व रिक्षा संघटनांनी या निर्णयाला विरोध केला असल्याची बाब माहे मे २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निर्णयाच्या विरोधात राज्यभरातील सर्व प्रादेशिक परिवहन कार्यालयांसमोर निदर्शन करण्याची घोषणा रिक्षाचालक-मालक संघटनेच्या संयुक्त कृती समितीने केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, रिक्षामालक- चालक यांच्या आंदोलनामुळे प्रवासी सेवेवर मोठा परिणाम होणार असल्याने ई-बाईक टॅक्सीच्या निर्णयाला स्थगिती देण्याची विविध रिक्षा चालक संघटनांनी मागणी मान्य करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक (१७-११-२०२५) :** (१) ई-बाईक टॅक्सीच्या विरोधात प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे येथे दिनांक ०९/०४/२०२५ रोजी ऑटोरिक्षा संघटनांनी एकदिवसीय निर्दशने केली आहेत.
(२) ई-बाईक टॅक्सीच्या निर्णयाच्या विरोधात कोल्हापूर जिल्ह्यातील रिक्षा संघटनांनी दिनांक २१/०५/२०२५ रोजी प्रादेशिक परिवहन अधिकारी, कोल्हापूर यांना निवेदन दिले आहे.
(३) याबाबतचे निवेदन प्राप्त झाले आहे.
(४) महाराष्ट्र बाईक टॅक्सी नियम, २०२५ प्रारूप नियमांच्या अधिसूचनेची प्रत दिनांक २२/०५/२०२५ रोजीच्या शासन अधिसूचनेद्वारे जनतेच्या माहितीकरीता प्रसिध्द करून हरकती/सूचना मागविण्यात आल्या होत्या. त्याअनुषंगाने विविध रिक्षा चालक संघटना तसेच वैयक्तीक रित्या प्राप्त झालेल्या हरकती व सूचना विचारात घेऊन दिनांक ०४/०७/२०२५ रोजीच्या अधिसूचनेन्वये अंतिम महाराष्ट्र बाईक टॅक्सी नियम, २०२५ प्रसिध्द केले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या स्थापत्य खात्याने सादर केलेल्या आगारांच्या पुनर्विकासाच्या प्रस्तावांबाबत

**(१८) २८०७ (१७-०७-२०२५) ॲड.अनिल परब : तारांकित प्रश्न क्रमांक ६६९ ला दिनांक १९ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या स्थापत्य खात्याने सादर केलेल्या आगारांच्या पुनर्विकासाच्या एकूण ३० प्रस्तावांपैकी १५ प्रस्ताव संचालक मंडळासमोर तोंडी सादर करण्यात आले व त्याबाबतचे लेखी प्रस्ताव नंतर करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना संचालक मंडळाच्या मान्यतेशिवाय ५० लाख रुपयांपर्यंतचे प्रस्ताव मान्य करण्याचे अधिकार आहेत हे अधिकार ३ कोटी रुपये इतके वाढविण्याच्या प्रस्तावास मंजुरी मिळाली नसतानाही सुमारे १३२ कोटी रुपयांची विदयुत विभागाच्या निविदांना उपाध्यक्षांनी मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरील दोन्ही प्रकरणांमधील भ्रष्टाचाराच्या चौकशीसाठी एसआयटी नेमण्यात येणार आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी ३० प्रस्तावांपैकी १५ प्रस्ताव संचालक मंडळासमोर तोंडी सादर करण्यात आल्याबाबत तसेच १३२ कोटी रुपयांची विदयुत विभागाच्या निविदांना मान्यता देण्याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक (१७-११-२०२५) :** (१) नाही.

(२), (३), (४) व (५) मा.संचालक मंडळाने उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना रुपये ३ कोटी इतक्या रक्कमेपर्यंतच्या निविदा स्विकृतीचे अधिकार महामंडळ ठराव क्र.२०२२:११:११ दिनांक १८/११/२०२२ नुसार प्रदान केल्यानंतरच विद्युत कामाच्या निविदांना उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी मंजुरी दिलेली आहे. त्यामुळे यामध्ये कुठलीही अनियमितता झालेली नाही.

---

## पिंपरी चिंचवड येथे मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी हे नियम बाह्यपध्दतीने वर्ग केल्याबाबत

**(१९) २८१५ (१८-०७-२०२५) ॲड.अनिल परब :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने सन २०२२ च्या उत्तरार्धात वा त्यानंतर राज्य मार्ग परिवहन महामंडळातील भारतीय पोलीस सेवा संवर्गातील मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी हे पदे पिंपरी चिंचवड येथे वर्ग केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०२२-२४ या कालावधीत अस्तित्वात नसलेल्या मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी या पदाचा अतिरिक्त कार्यभार घेऊन दुय्यम अधिकाऱ्याने अनेक नियमबाह्य बदल्या केल्या असून महामंडळाच्या विशिष्ट अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचाराच्या तक्रारी बंद केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी शासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत करण्याबाबत तसेच चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित उपमुख्य सुरक्षा व दक्षता अधिकाऱ्यास सक्तीच्या रजेवर पाठविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक (१०-११-२०२५) :** (१) होय.

(२) नाही.

(३) व (४) कोणताही गैरप्रकार घडलेला नसल्याने तसेच तक्रार प्राप्त झालेली नसल्याने कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

---

## नागपूर शहरातील एस.टी. महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या निवासी इमारतींची दुरवस्था झाल्याबाबत

**(२०) ३०९१ (१७-०७-२०२५) श्री.संदीप जोशी :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील एस.टी. महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या सहा निवासी इमारतींचे बांधकाम ५० वर्षे जूने असून सदर इमारती अत्यंत जीर्ण झाल्या असून त्या दुरवस्थेत असल्यामुळे कर्मचारी व त्यांचे कुटूंबीय जीव मुठीत घेवून वास्तव्य करीत असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमार्तींची योग्य दुरुस्ती, डागडुजी व देखभाल करण्यात आली नसल्यामुळे तसेच मूलभूत सुविधांचा अभाव असल्यामुळे येथे वास्तव्यास असलेले कर्मचारी व त्यांचे कुटुंबिय सतत भितीच्या वातावरणामध्ये वास्तव्य करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त इमारतींचे संरचनात्मक लेखापरिक्षण करून तपासणी केली आहे काय, तपासणी अहवालात काय आढळून आले त्यानुसार सदर इमारतींचा पुनर्विकास करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक (१२-११-२०२५) :** (१), व (२) सदर निवासी इमारतींची योग्य दुरुस्ती, डागडुजी व वेळोवेळी आवश्यकतेनुसार देखभाल करण्यात येते.

(३) व (४) सदर इमारतींचे संरचनात्मक परिक्षण अद्याप करण्यात आले नसले तरी सार्वजनिक खाजगी सहभागाअंतर्गत विकसनाचे नियोजन प्रस्तावित आहे.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.